# आर्किटेक्चरच्या विद्यार्थिनीने जिंकला नॅशनल डिझाईन ॲवॉर्ड



मुंबई : जागृती जैन या ग्वालियर येथील एमआयटीएस (माधव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी ॲण्ड सायन्स) च्या आर्किटेक्चर विभागाच्या चौथ्या वर्षाच्या विद्यार्थिनीने नॅशनल डिझाईन अवॉर्ड जिंकला. बिर्ला व्हाईट युवारत्न स्पर्धेत अमरावती कन्व्हेन्शन सेंटरच्या तिच्या मागील वर्षातील संकल्पनेसाठी हा पुरस्कार तिला देण्यात आला. भारतीय आर्किटेक्चरच्या क्षेत्रात हा बिर्ला व्हाईट पुरस्कृत पुरस्कार सर्वोच्च मानाचा मानला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या डिझाईन इन इंडिया या सुंदर भारताच्या उभारणीच्या ध्येयवाक्याशी सुसंगत अशी ही स्पर्धा तरुण आर्किटेक्टना त्यांचे सर्वोत्तम काम करण्यासाठी प्रेरित करते. भारत आणि नेपाळच्या आर्किटेक्चर क्षेत्रातून या वर्षीच्या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला. १०० संस्थांकडून सुमारे २००० हून जास्त प्रवेशिका बिर्ला व्हाईटच्या या स्पर्धेत दाखल झाल्या. माझे आणि एमआयटीएसचे नाव विजेते म्हणून जाहीर झाल्यावर माझा आनंद गगनात मावेनासा झाला. या पुरस्कारामुळे भारताच्या आर्किटेक्चर शिक्षण क्षेत्रातील आमच्या संस्थेचा लौकिक अधोरेखित झाला. एक मान्यताप्राप्त मूलभूत सेवा म्हणून अमरावतीच्या कन्वेन्शन सेंटरसाठी माज्या संकल्पनेचा वापर झालेला मला खूप आवडेल, असे जागृती जैन म्हणाली.